**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग प्राथमिक**
**ई-मेल eduprlp2info@gmall.com**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. जिप/शिक्षण/प्राथ.२/यो-१/८०७/८८६८/२०२३** **दिनांक - ०८/११.२०२३**

**प्रति,**

**गट शिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती, मावळ**

**विषय- रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था यांच्या CSR निधीमधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलसे, ता. मावळ शाळेतील भौतिक सुविधांची कामे करणेस परवानगी देणेबाबत..**

**संदर्भ- १. रायत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे कडील पत्र दिनांक २६.०६.२०२३**
**२. गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, मावळ यांचेकडील पत्र जा. क्र. शिक्षण/सशिअ/आस्था/२२६/२३, दिनांक ३०.१०.२०२३**
**३. पंचायत समिती, मावळ सर्वसाधारण मासिक सभा दि. १९.१०.२०२३ च्या सभेमधील मंजुर ठराव क्रमांक ११७**

**रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे यांचेमार्फत** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलसे, ता. मावळ शाळेतील भौतिक सुविधांतर्गत खाली नमुद केलेली कामे करणेस तयार असलेबाबत संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये कळविले असुन सदर प्रस्तावास संदर्भीय क्र. ३ अन्वये परवानगी मिळणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर शाळेमध्ये रयत फाऊंडेशन संस्था, पुणे यांचेमार्फत खालीलप्रमाणे कामे करण्यात येणार आहेत-

१. शालेय भौतिक सुविधा व शालेय दुरुस्ती, शालेय रंगरंगोटी व आतून बाहेरुन बोलक्या भिंती करणे.
२. शालेय खिडक्या व दरवाजे दुरुस्ती करणे.
३. हॉल बाहेरील बाजू प्लास्टर व वरांडा फरशी काम करणे.
४. मुलांचे नवीन शौचालय बांधकाम व मुलींच्या शौचालयाचे बांधकाम करणे.
५. अपुर्ण संरक्षण भिंतीचे बांधकाम पुर्ण करणे.
६. ५० बेंच उपलब्ध करुन देणे.
७. मुलांच्या सुरक्षिततेसाठी व्हरांडयामध्ये ग्रील ४ फुटापर्यंत बसविणे.
८. स्वयंपाक खोली समोरील भागाचे कोबा करुन देणे.
९. षटकोनी २ वर्ग खोल्या व ऑफिस वॉटर प्रुफिंग करणे.
१०. ऑफिस टेबल व खुर्ची देणे.
११. ग्रंथालय कपाट, ऑफिस कपाट, २ सिलींग फॅन, २ वॉल फॅन देणे.
१२. विविध खेळणी बसविणे.
१३. रॅम्प दुरुस्ती व गेट दुरुस्ती करणे.

Scanned with CamScanner

१४.क्रीडांगणाची मुरुम टाकून लेवल करणे व सुशोभिकरण करणे.

१५.संपुर्ण शाळेमध्ये क्रीडा, सांस्कृतिक व भौगोलिक विविध प्रकारच्या पेंटींग काढणे.

१६. ३ स्मार्ट टीव्ही संच देणे.

१७. ६ भिंतीवरील घडयाळ देणे.

१८.७ चप्पल स्टॅण्ड देणे.

१९.साऊंड सिस्टीम वर्ग खोल्यांसहित बसविणे.

२०. २ ढोल देणे.

२१.शाळा व मुला-मूलींच्या शौचालयामध्ये विदयुत कनेक्शन करणे.

२२.शालेय वर्गातील काही पत्रे बदलणे. (२ वर्गांचे गंजलेले पत्रे) इ. कामे करणार आहेत.

त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास पुढील अटी / शर्तींना अधिन राहून मंजुरी देणेस हरकत नाही. सदर अटींचे उल्लंघन झाल्यास सदरची मंजुरी रदद करण्यात येईल.

१. सदर कामासाठी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मावळ यांनी **रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे** यांचे समक्ष विहीत नमून्यात व स्वयंस्पष्ट M.O.U.करावा व M.O.U.ची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

२. सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करुन घेवून त्यावर समग्र शिक्षा शाखा अभियंता यांची स्वाक्षरी व सदर अंदाजपत्रकास जिल्हास्तरावरील कार्यकारी अभियंता, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, पुणे यांची तांत्रिक मान्यता घेण्यात घ्यावी.

३. सदर बांधकामांसाठी लागणारा संपुर्ण निधी उपलब्ध करणे, कामे गुणवत्तापुर्वक व विहीत मुदतीत समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत असणारे कनिष्ठ अभियंता यांचे मार्गदर्शनाखाली पुर्ण करणे याची संपुर्ण जबाबदारी **रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे** आणि संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांची राहील. जिल्हा परिषद अथवा सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सदर उपक्रमासाठी निधी उपलब्ध होणार नाही.

४. बांधकाम गुणवत्तापुर्वक पुर्ण होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत असणारे कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, मावळ यांचेशी समन्वय साधून बांधकामाचे वेळोवेळी तांत्रिक पर्यवेक्षण करुन घ्यावे व काम गुणवत्तापुर्वक पुर्ण करुन घ्यावे.

५. बांधकाम गुणवत्तापुर्वक पुर्ण करुन घेण्याची संपुर्ण जबाबदारी **रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे** यांची राहील.

६. बांधकामावरील कामगारांचा विमा उतरवण्याची जबाबदारी **रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे** राहील.

७. लोखंड, वाळु, विटा, खडी, सिमेंट व कॉंक्रीट यांचे नमुने वेळोवेळी शासकीय प्रयोगशाळेतुन तपासुन अहवाल गट शिक्षणाधिकारी कार्यालयात ठेवावा.

८. बांधकाम पुर्ण झालेवर संबंधित संस्था, कनिष्ठ अभियंता, ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती यांनी संयुक्तपणे पुर्णत्व प्रमाणपत्र सादर करावे.

९. बांधकाम चालु असताना विद्यार्थ्यांच्या शिक्षकांची, ग्रामस्थांची व अभ्यागतांची सुरक्षितते बाबतची संपुर्ण जबाबदारी **रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, पुणे** यांची राहिल.

१०.सदर बांधकामांची मालकी जिल्हा परिषदेची राहील. काम पुर्ण झाल्यावर ग्रामपंचायत दफतरी इमारतीची नोंद करण्यात यावी.

Scanned with CamScanner

११. बांधकाम पुर्ण करण्याचा तसेच साहित्य पुरविण्याचा कालावधी सहा महिने राहील.

१२. इमारत पुर्ण झाल्यावर इमारतीचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस करण्यात यावे याची जबाबदारी संबंधित कंपनीची राहिल.

१३. अनुषंगिक अटींमध्ये किंवा करारनाम्यामध्ये बदल, सुधारणा किंवा रदद करणेचा अंतिम अधिकार जिल्हा परिषदेचा राहिल.

(रमेश चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद पुणे

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ
२. रयत फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्था, साईज्ञान बंगला, समर्थ कॉलनी, कळमकरवस्ती, बाणेर, पुणे ४११०४५
३. संबंधित शाळा व्यवस्थापन समिती, --------------------, ता. मावळ, जि. पुणे

Scanned with CamScanner